माहिती हवीय?

भरत चंद्रकांत कालूवाला, मुंबई.

□ 'देखो वो चाँद झुमके कहता है क्या इशारे' हे गाणे कोणत्या चित्रपटातील? या चित्रपटातील प्रमुख कलाकार, गीतकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?

— हे गाणे १९५४च्या *शर्त* या चित्रपटातील लता मंगेशकर व हेमंतकुमार यांनी गायले होते. श्यामा, दीपक, शशिकला, आय. एस. जोहर, सुलोचना (रुबी मायर्स), चमन पुरी, जगदीश कंवल या चित्रपटातील प्रमुख कलाकार होते. गीतकार एस. एच. बिहारी, संगीतकार हेमंतकुमार, फिल्मीस्तानने हा चित्रपट निर्माण केला होता व विभूती मित्रांनी दिग्दर्शन केले होते.

ज्योती मनोहर कोळी, वरेडी, कोळीवाडा.

□ *मदर इंडिया* कोणी निर्माण केला होता?

— *मदर इंडिया* नावाचा चित्रपट आतापर्यंत दोन वेळा निर्माण झाला आहे. १९३८ साली पहिला चित्रपट *मदर इंडिया* इंडियन सिने पिक्चर्सने निर्माण केला होता व १९५७ साली दुसरा *मदर इंडिया* मेहबूब प्रॉडक्शनने निर्माण केला होता.

जय जगदीश कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ धर्मेंद्र-हेमामालिनी व कमल हासन-सारिका यांचे प्रेमसंबंध कोणत्या चित्रपटात जुळले?

— *प्रतिज्ञा* या चित्रपटाच्यावेळी धर्मेंद्र-हेमामालिनी यांचे प्रेमसंबंध जुळले, तर *राजतिलक*च्या वेळी कमल हासन व सारिका यांचे.

कृष्णा अंबाजी कोळी, वरेडी पेण.

□ रिमा लागूचा पहिला चित्रपट कोणता?

— १९६३ साली एक मराठी चित्रपट पडद्यावर आला होता. *तू सुखी रहा* या चित्रपटातील 'झुकझुक आगीन गाडी...' या गाण्यात अनेक लहान मुलं पडद्यावर दिसतात. या मुलातील एक मूल होती रिमा लागू. मुलाच्या पेहरावात ती पडद्यावर दिसली होती. ही भूमिकाच चित्रपटातील तिची पहिली भूमिका. प्रौढ वयात १९७८च्या *सिंहासन* या मराठी चित्रपटात ती सर्वात प्रथम पडद्यावर दिसली. १९८०चा *कलयुग* हा तिचा पहिला हिंदी चित्रपट.

सूर्यकांत जनार्दन कोळी, नवघर, कोळीवाडा.

□ रवीना टंडनचा पहिला चित्रपट कोणता? या चित्रपटात तिचा नायक कोण होता?

— १९९१ साली पडद्यावर आलेला *पत्थर के फूल* रवीनाचा पहिला चित्रपट. या चित्रपटात सलमान खान तिचा नायक होता.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ फरिदा जलालने कोणकोणत्या चित्रपटात नायिकेची भूमिका केली? नायक कोण?

महेश कांबळे, नाशिक.

□ लीना चंदावरकरने कोणकोणत्या चित्रपटांत भूमिका केल्या?



मेहबूब की मेहंदीमध्ये लीना चंदावरकरबरोबर राजेश खन्ना

— *मन का मीत, हमजोली, जबाब, सास भी कभी बहू थी, जाने अनजाने, मैं सुंदर हूं,* ***मेहबूब की मेहंदी,*** *प्रीतम, रखवाला, अनहोनी, एक कुंवारा एक कुंवारी, कैद, हनीमून, मनचली, बिदाई, इमान, बैराग, अपने रंग हजार, चोर चोर, एक महल हो सपनों का, जग्गू, मेहबूब की मेहंदी, नामी चोर, नालायक, सरफरोश* या चित्रपटांत.

— *आराधना* (राजेश खन्ना), *प्यार की कहानी* (अनिल धवन), *आंगन* (देव मुखर्जी); *खोज* (दीपककुमार), *बीस साल पहले* (रितेश), *डॉक्टर एक्स* (सोमदत्त), *जीवनरेखा* (तबरेज), *संकल्प* (महेश), *धोती लोटा चौपाटी* (रमेश अरोरा), *अवलिया ए इस्लाम* (तबरेज) या चित्रपटात फरिदा जलाल नायिकेच्या भूमिकेत चमकली.

मनोज कामत, कोल्हापूर.

□ किशोरकुमारला कोणकोणत्या चित्रपटासाठी पार्श्वगायनाचे पारितोषिक मिळाले?

— *आराधना* (रूप तेरा मस्ताना...), *अमानुष* (दिल ऐसा किसी ने...), *डॉन* (खई के पान बनारसवाला...), *थोडी सी बेवफाई* (हजार राहे...); *नमक हलाल* (पग घुंघरू बांध...), *अगर तुम न होते* (हमे और जीने की...), *शराबी* (मंजिले अपनी जगह...), *सागर* (सागर किनारे).

सौमित्र भडकमकर, कानसई अंबरनाथ.

□ नूतन व शम्मी कपूर यांनी कोणकोणत्या चित्रपटात नायक-नायिकेची भूमिका केली?

— *लैला मजनू, बसंत, लाटसाब.*

कृष्णा आबाजी कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ कविता कृष्णमूर्ती व उदित नारायण यांचा पहिला चित्रपट कोणता?

— कविताचा पहिला चित्रपट *कादंबरी*, उदित नारायणचा पहिला चित्रपट *उन्नीस बीस.*

संगीता नरेश कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ गुरुदत्त व वहिदा रेहमान यांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता? गुरुदत्त यांच्या कोणत्या पहिल्या चित्रपटाला राष्ट्रीय पारितोषिक मिळाले?

— १९५८चा *बारह बजे*. गुरुदत्त व वहिदा रेहमान यांनी नायक-नायिकेची भूमिका केलेला पहिला चित्रपट, गुरुदत्त यांच्या *साहिब बीबी और गुलाम*ला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता.

सुमन लहू कोळी, वरेडी.

□ अमिताभला कोणत्या चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता?

— *अग्निपथ*साठी.

भरत चंद्रकांत वालुवाल, माहीम कॉजवे मुंबई.

□ देवकुमारने कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केली? नायिका कोण?



— *मेरे लाल, घर का चिराग* (इंद्राणी मुखर्जी), *एक फूल एक भूल* (जयंती), *फरेब* (फरियाद), *फरिस्ता* (निवेदिता), *स्पाय इन रोम* (जयमाला), *बँक रॉबरी* (निवेदिता), *नई जिंदगी* (कुमकुम), *रोड टू सिक्कीम* (अंजू महेंद्रू), *रात के अंधेरे में* (सोनिया साहनी), *सिमला रोड* (सरिता), *दगाबाज* (जयश्री गडकर), *पत्नी, ट्रक ड्रायव्हर* (इंद्राणी मुखर्जी); *वीर अमरसिंह राठोड* (कुमकुम) या चित्रपटात देवकुमार नायकाच्या भूमिकेत चमकला.

नौशाद ॲकॅडमीला नुकतीच जागा मिळाली आहे. परंतु ती संस्था अजून पूर्णस्वरुपात कार्यरत झालेली नाही. तरी वाचकांनी या पुढील माहिती नौशाद, आशियाना, कार्टर रोड, बांद्रा, मुंबई-५० येथून मिळवावी.